**रे.दि.अ.नं. ५४/२०१६**

काशिनाथ चव्हाण वि. सुभाष खोत

**निशाणी २७, २९ व ३१ वरील आदेश** :

१ . अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुतचे अपील हे रे.दि.मु.नं.३९५/२००७ मधील न्यायनिर्णया विरुध्द दाखल केलेले आहे. प्रस्तूत प्रकरणातील जाबदार नं. ६ शंकर तुकाराम खोत व जाबदार नं. १५ सौ. वत्सला नामदेव यादव हे अनुक्रमे दिनांक ०६/०५/२०२१ व ता. ११/००८/२०२१ रोजी पडवळवाडी व पलूस येथे मयत झाले आहेत. त्यांचा मृत्युचा दाखला तसेच त्यांच्या वारसांची माहिती वेळेत न मिळाल्याने त्यांचे वारस या कामी वेळेत अभिलेखावर घेता आले नाहीत. त्यांना अर्जात नमुद केले प्रमाणे वारस आहेत. त्यामुळे जाबदार नं. ६ व १५ चे अर्जात नमुद केले प्रमाणे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर माफ होऊन, त्याप्रमाणे अपीलनाम्यात दुरुस्ती होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचे अर्ज केले आहेत. जाबदार यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश होणेबाबत विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर जाबदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता, अपीलाचे काम सुरु असताना यातील जाबदार नं. ६ शंकर तुकाराम खोत व जाबदार नं. १५ सौ. वत्सला नामदेव यादव हे अनुक्रमे दिनांक ०६/०५/२०२१ व ता. ११/०८/२०२१ रोजी मयत झाले असल्याचे

निशाणी ३४ सोबत दाखल मृत्युप्रमाणपत्रांवरुन दिसुन येते. अपेलंट यांच्या कथनानुसार मयत जाबदार यांना अर्जात नमुद केले प्रमाणे वारस आहेत. प्रकरणाचे स्वरुप पहाता त्यामध्ये अपीलकार व जाबदार यांचे हक्क व हितसंबंध असल्याचे दिसुन येते. मयत जाबदाराचे वारस या कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांच्याशिवाय वाद विषयाचे समुळ निराकरण होणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज निशाणी २७, २९ व ३१ खर्च रु. १०००/– वरती मंजूर.

२. अर्जात नमुद केलेप्रमाणे अपीलकार यांनी या आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसाच्या आंत खर्चाची रक्कम न्यायालयात जमा करावी व अपीलमेमोत दुरुस्ती करुन दुरुस्त अपीलनाम्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन जाबदारांना देखील पुरवावी.

३. खर्चाची रक्कम शासनास अदा करण्यात यावी.

ANIRUDDHA SUBHASH GANDHI

Digitally signed by ANIRUDDHA SUBHASH GANDHI
Date: 2025.02.15 17:19:58 +0530

(अनिरुध्द सुलभा सुभाष गांधी)

दिनांकः– १५/०२/२०२५ जिल्हा न्यायाधीश –१, इस्लामपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Shri. Pradip T. Patil (Grade-I) |
| Court Name | : | District Judge-1 & ASJ Islampur. |
| Date of Judgment/order | : | 15/02/2025 |
| Signed by P.O. on | : | 15/02/2025 |
| Uploaded on | : | 15/02/2025 |